# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)

## *“ महाकृषि ऊर्जा अभियान ”*
## अंतर्गत राज्यातील कृषिपंप वीज जोडण्यांचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्याची प्रधानमंत्री कुसुम-ब योजना

## फसव्या संकेतस्थळापासून सावध

या विभागाच्या असे निदर्शनास आले की, काही बनावट संकेतस्थळ व मोबाईल ॲपद्वारे महाकृषि ऊर्जा अभियान अंतर्गत राज्यातील कृषिपंप वीज जोडण्यांचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्याची प्रधानमंत्री कुसुम-ब या योजनेच्या नावाखाली शेतकऱ्यांना सौरपंप बसविणेसाठी अर्ज भरण्यासाठी तसेच नोंदणी फी आणि पंपाची किंमत ऑनलाईन भरणेसाठी सांगण्यात येत आहे. यातील काही खोट्या संकेतस्थळाची नावे .org, .in, .com अशा पध्दतीने नोंदणीकृत आहेत. त्यातील काही नावे असे की, www.kusumyojanaonline.in.net, www.pmkisankusumyojana.co.in,www.onlinekusumyojana.org.in आणि www.pmkisankusumyojana.com आणखी काही संकेतस्थळे आहेत.

प्रधानमंत्री कुसुम योजनेसाठी अर्ज करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना असे आवाहन करण्यात येते की, अशा खोट्या / फसव्या संकेतथळांना भेट देऊ नये तसेच कोणत्याही प्रकारचा पैसे भरणा करू नये. महाकृषि ऊर्जा अभियान अंतर्गत राज्यातील कृषिपंप वीज जोडण्यांचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरण करण्याची प्रधानमंत्री कुसुम-ब योजना राज्य सरकारच्या “महाऊर्जा” या विभागामार्फत राबविण्यात येणार असून सदरील योजना सुरू करतेवेळी याबाबत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल व त्याची लिंक महाऊर्जा, महावितरणच्या नोंदणीकृत वेबसाईटवरच असेल. सदरील योजनेच्या अधिक माहितीसाठी महाऊर्जाच्या https://www.mahaurja.com संकेतस्थळावर भेट द्यावी.